# अर्थशास्त्र

## सर्वसाधारण सूचना

- अर्थशास्त्र विषयाचा अभ्यास करताना नेमका आपण कोणत्या परीक्षेसाठी करत आहोत हे लक्ष्यात घ्या. कारण परीक्षे नुसार स्तर बदलतो व त्या नुसार अभ्यास पातळी ठरते.
- राज्यसेवेसाठी साठी या नोट्स चा वापर करु नये; त्यासाठी चालू वर्षीचे कोळंबे सरांचे किंवा देसले सरांचे पुस्तक अभ्यासा. सोबत चालू घडामोडी चा संबंध जुळवा. ( सरावा साठी या नोट्स वापरू शकता )
- या नोट्स वर्ग दोन आणि वर्ग तीन च्या परीक्षेसाठी अभ्यासू शकता. या मुळे नक्कीच तुमच्या सरावात मदत होईल.
- अर्थशास्त्र विषयात घटक अभ्यासाला महत्व द्या. महत्वाचे निर्देशांत आणि भारताचा त्यातील क्रमांक लक्ष्यात असू द्या. लोकसंख्या हा घटक अर्थशास्त्र आणि भूगोल संबंधित आहे त्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्या.
- परीक्षेचा स्तर बारावी असेल तर शक्यतो त्याची पातळी ही वन लाईनर स्वरूपाची आणि सोपी असते त्यामुळे या साठी या नोट्स महत्वाच्या ठरतील.
- नोट्स लिहिताना परीक्षाभिमुख माहिती घेतलेली आहे. त्यामुळे यातून आणखी शॉर्टकट शोधण्याचा प्रयत्न करू नका. सर्व महत्वाचे घटक यात आहेत.
- लॅपटॉप वर या नोट्स वाचत असाल तर फूल स्क्रीन मोड मध्ये वाचा. जर वापरकर्ता मोबाइल वापरत असेल तर मोबाइल आडवा पकडावा.
- मुद्दामून फॉन्ट ची साईज कमी केलेली आहे. जेणेकरून कमी जागे मध्ये जास्त माहिती देता येईल. विनाकारण जास्त पानांची संख्या वाढल्यास वाचनाची इच्छा होत नाही.
- वर्ग दोन आणि तीन साठी या नोट्स अभ्यासताना- अगोदर मागच्या प्रशपत्रिका तपासा – त्यातील महत्वाचे घटक लिहून काढा – जसे, लोकसंख्या , मौद्रीक धोरण, योजना, अंदाज पत्रक, राजकोशीय नीती, आणि या वरील प्रश्नाचा बारकाईने अभ्यास करा. त्यासाठी रंजन कोळंबे सरांचे अर्थशास्त्र वाचा ( राजयसेवेसाठी - देसले सर ) आणि त्यानंतर या नोट्स वाचा.
- परीक्षेसंबंधी कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास मला विचारू शकता. शक्य असल्यास नक्की मदत करण्यात येईल.

तुम्हा सर्वांना परीक्षेसाठी खूप साऱ्या शुभेच्या


यशस्वी भव !!

अर्थशास्त्र ही संज्ञा आयकोनोमिया या ग्रीक शब्दापासून बनली असून कौटुंबिक व्यवस्थापन असा त्याचा अर्थ होतो. अर्थशास्त्र एक सामाजिक शास्त्र आहे. अर्थशास्त्र व्यवस्थित संबंधित असल्याने त्याला राजकीय अर्थशास्त्र म्हणूनही ओळखले जाते.

अर्थशास्त्र म्हणजे अमर्याद गरजा आणि मर्यादित म्हंजे पर्यायी उपयोगाची साधने यांच्या संबंधित केल्या जाणाऱ्या मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र होय.

- सनातनवादी अर्थतज्ञ ॲडम स्मिथ यास अर्थशास्त्राचा जनक म्हणून ओळखले जाते.
- अर्थशास्त्राची व्याख्या - "अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीचे शास्त्र"

( ॲडम स्मिथ - 1776 )



## प्रसिद्ध पुस्तके आणि लेखक

| | |
|---|---|
| अर्थशास्त्र - | विष्णू गुप्त चाणक्य |
| राष्ट्राची संपत्ती - | ॲडम स्मिथ ( 1776 ) |
| अर्थशास्त्राची मूलतत्त्वे - | प्राध्यापक अल्फ्रेड मार्शल ( 1890 ) |
| अर्थशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व - | प्राध्यापक रोबिन्स ( 1932 ) |
| भारतातील दारिद्र्य - | दांडेकर आणि निळकंठ रथ |
| प्लॅनिंग अँड द पुअर - | प्रा - मिन्हास |

## अर्थव्यवस्थेचे क्षेत्रीय विभाजन.

**१ ) खाजगी क्षेत्र** - उत्पादने साधने यांची मालकी व व्यवस्थापन खाजगी स्वरूपाचे म्हणजेच खाजगी संस्थांकडे दिलेले असते उदा - अमेरिका जपान

**२ ) सरकारी क्षेत्र** - उत्पादने साधने यांची मालकी व व्यवस्थापन सरकारच्या ताब्यात असते.

**३ ) संयुक्त क्षेत्र** - उत्पादन; साधने यांची मालकी व व्यवस्थापन खाजगी व सरकारी असे संयुक्तपणे नियंत्रित असते उदा - भारत

## अर्थव्यवस्थेचे प्रकार ( मुख्य प्रकार तीन )

१ ) भांडवलशाही अर्थव्यवस्था - या अर्थव्यवस्थेतील उत्पादन व साधने यांची मालकी व व्यवस्थापन यावर खाजगी व्यक्ती किंवा संस्थांचे नियंत्रण असते यामध्ये उत्पादकांचा मुख्य उद्देश जास्तीत जास्त नफा मिळवणे/कमावणे हा असतो. उदा - अमेरिका जर्मनी जपान यांची अर्थव्यवस्था.

२ ) समाजवादी अर्थव्यवस्था - यामध्ये उत्पादन व साधनांची मालकी व व्यवस्थापन यावर शासनाचे संपूर्ण नियंत्रण असते. सामाजिक कल्याण साधने हा प्रमुख उद्देश असतो. उदा चीन, रशिया, कोरिया, यांची अर्थव्यवस्था.

३ ) मिश्र अर्थव्यवस्था - या अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांचे सह अस्तित्व आढळते. यामध्ये नफा व सामाजिक कल्याण यांचा समन्वय साधला जातो. उदा- भारत, स्वीडन, ऑस्ट्रेलिया यांची अर्थव्यवस्था.

## अर्थव्यवस्थेतील संयुक्त क्षेत्रांचे वर्गीकरण


PPP - public private partnership

BOT - built operate transfer

BOOT - built own operate transfer

BOO - built own operate

BOLT - built on leaze transfer




## अर्थव्यवस्थेचे विभाजन

- **प्राथमिक क्षेत्र** - ( शेती / 16.1 % ) पशुपालन, कुक्कुटपालन, दूध उत्पादन, मस्योत्पादन, खानकाम,जंगले.
- **द्वितीय क्षेत्र** - ( औद्योगिक क्षेत्र 29.5 % ) कारखाने, जल व विद्युत पुरवठा, नैसर्गिक वायू, बांधकाम.
- **तृतीय क्षेत्र** - ( सेवा क्षेत्र 54.4 % ) वाहतूक व तळवळण, व्यापार, बँका, विमा, आरोग्य, शिक्षण, वित्त, मनोरंजन, हॉटेल. इत्यादी

## भारतीय अर्थव्यवस्था थोडक्यात.

- भारतीय अर्थव्यवस्था संमिश्र अर्थव्यवस्था आहे. यामध्येही अर्थव्यवस्था पूर्णपणे विकसितही नाही व मागासलेली ही नाही त्यामुळेच या अर्थव्यवस्थेला विकसनशील अर्थव्यवस्था म्हणतात.
- भारतीय अर्थव्यवस्थेचा जागतिक अर्थव्यवस्थेत 2.42% वाटा आहे.
- जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा सातत्याने घटता असून सध्या तो 1.5 % इतका आहे.
- जन्मदर म्हणजे एका वर्षात प्रति एक हजार लोकसंख्येमागे जन्माला आलेल्या बालकांची संख्या.
- मृत्युदर म्हणजे एका वर्षात प्रती एक हजार लोकसंख्येमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या.
- मातामृत्यू दर - एक लाख लोकसंख्येमागे मोजला जातो.
- जिवीत प्रमाण दर - जन्मदर व मृत्यू दर यांच्यातील प्रमाण म्हणजे जीवित प्रमाण दर होय यालाच जगण्याचा दर असेही म्हणतात. हा दर लोकसंख्येतील खरी वाढ दर्शवतो.
- [ जीवित प्रमाण दर = जन्मदर - मृत्युदर ]

## दारिद्र्य

दारिद्र्य सापेक्ष संकल्पना आहे कारण दारिद्र्य म्हणजे जीवनावश्यक गरजांचा अभाव असणे.

### दारिद्र्याचे प्रकार १ ) सापेक्ष दारिद्र्य २ ) निरपेक्ष दारिद्र्य

1 ] सापेक्ष दारिद्र्य –

- श्रीमंत व गरिबांमधील संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाच्या वितरणातील तफावत म्हणजेच सापेक्ष दारिद्र्य होय.
- थोडक्यात श्रीमंत व गरिबांमधील सरासरी विषमता सापेक्ष दारिद्र्यातून दिसून येते.
- या दारिद्र्याचे निर्मूलन करता येत नाही.
- सापेक्ष दारिद्र्य ही सर्व देशात आढळणारी कल्पना आहे
- दरडोई उत्पन्न व दरडोई उपभोग खर्च यांच्या तुलनेवर ही संकल्पना आधारित असते.


## बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक

ऑक्सफर्ड पॉवर्टी अँड ह्युमन डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट 2010 पासून एम पी आय ( MPI ) हा निर्देशांक मोजते

( MPI ) मोजण्यासाठी आवश्यक महत्त्वाचे तीन घटक

**आरोग्य - शिक्षण - राहणीमान**

MPI मानांकन




- 20% ते 33.33% - आर्थिक दृष्ट्या असुरक्षित
- 33.33% ते 50% - बहुआयामी गरीब
- 50% ते अधिक - तीव्र बहुआयामी

ग्रामीण भारतातील जनतेच्या दारिद्र निर्मूलनासाठी केंद्र शासनाने 1961 साली प्रकर्शित ( सधन ) शेती जिल्हा कार्यक्रम सुरू केला आणि त्या सोबत खालील काही महत्वाचे पंचवार्षिक प्रयोग.

### पाचवा योजना काळ

- 1 जुलै 1975 मूळ वीस कलमी कार्यक्रम सुरू
- कामांसाठी धान्य
- किमान गरजा कार्यक्रम / गरिबी हटाव चां नारा दिला

### सहावी योजना ( प्रमुख विकास कार्यक्रम )

- इंदिरा आवास व जीवनधारा योजना
- एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
- ग्रामीण भागातील महिला व बालकांचा विकास
- ग्रामीण युवा स्वयंरोजगार कार्यक्रम

•

## 2011 मधील महत्वपूर्ण आकडेवारी

- सर्वाधिक लोकसंख्या - उत्तर प्रदेश ( १९९. ८१ % )
- सर्वात कमी लोकसंख्या – सिक्कीम ( ६. १० हजार फक्त )
- 2001 ते 2011 वृध्दी दर 17.7%
- सर्वाधिक दशवार्षिक वाढ - दादरा नगर हवेली ( 55.88 % )
- दमन दीप - ( 53.76 % )
- सर्वात कमी दशवार्षिक वाढ नागालँड - ( 0.58 )
- सर्वाधिक दशवार्षिक वाढ राज्य मणिपूर - ( 31.08 % )


### लिंग गुणोत्तर

- 2001 - 933 2011 - 943
- ग्रामीण भाग - 949
- शहरी भाग - 929
- सर्वाधिक लिंग गुणोत्तर केरळ - 1084
- सर्वात कमी लिंग गुणोत्तर दिव दमन - 618
- सर्वात कमी लिंग गुणोत्तर राज्य हरियाणा - 879
- 0 - 6 वयोगटातील लिंग गुणोत्तर
- 2001 - 927 2011 - 918
- ग्रामीण भाग 923 - शहरी भाग 905
- सर्वाधिक बाल लिंग गुणोत्तर 972 / सर्वात कमी बाल लिंग गुणोत्तर - हरियाणा 834



### लोकसंख्या घनता -

- भारत - 2001 - 325 ( 2011 - 382 )
- महाराष्ट्र - 2001 - 315 ( 2011 - 365 )
- साक्षरता दर 2011 - 72.98



## हे सुद्धा लक्षात घ्या...!!

- ✓ नरसिंह समितीची स्थापना 1991 मध्ये झाली होती ते आरबीआयचे 23 गव्हर्नर होते. त्यावेळेस सी आर आर चे प्रमाण 15% वरून तीन ते पाच टक्के पर्यंत कमी करावे व एस एल आर चे प्रमाण 38.5% वरून 25% पर्यंत कमी करावे अशी त्यांनी शिफारस मांडली होती.
- ✓ सोबत देशात चतुस्तरीय बँक रचना असावी व तीन ते चार आंतरराष्ट्रीय दर्जा बँका देशांमध्ये असाव्या.
- ✓ काही स्थानिक बँक असाव्या व काही ग्रामीण बँक असाव्या व शाखा परवाना पद्धती बंद करावी.
- ✓ सोबत भांडवल बाजाराचे उदारीकरण घडवून आणावे
- ✓ अशा काही महत्त्वाच्या शिफारसी त्यांनी मांडल्या आहेत.

## भारतीय कर संरचना ( हा भाग खास करून मुख्य परीक्षेसाठी आहे )

**कलम 256 अंतर्गत कर आकारण्याचा अधिकार सरकारला असतो.**

**[ प्रत्यक्ष कर ]** A ) उत्पन्नावरील कर - वैयक्तिक कर / महामंडळकर B ) संपत्ती कर - मालमत्ता कर / देणगी कर / संपत्ती कर C ) भांडवली व्यवहारावरील कर - भांडवली लाभ कर

**[ अप्रत्यक्ष कर ]**

A ) अबकारी कर - केंद्रीय अबकारी कर / राज्य अबकारी कर

B ) सीमा जकात कर - आयात कर / निर्यात कर

C ) विक्रीकर - केंद्रीय विक्रीकर / राज्य विक्रीकर

D ) सेवाकर

E ) करमणूक कर

## GST ( वस्तू व सेवा कर )

- एकेरी मूल्यवर्धित कर प्रणाली
- 2004 विजय केळकर समितीने जीएसटी संकल्पना मांडली
- 2006 ते 2007 बजेटमध्ये पी चीदबरम यांनी 1 एप्रिल 2010 पासून जीएसटी लागू करण्याची घोषणा केली.
- 2011 साली संसदेत 115 वे घटनादुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले.
- 19 डिसेंबर 2014 रोजी नवीन 122 वे घटनादुरुस्ती विधेयक.
- लोकसभेत सादर 06 मे 2015
- राज्यसभेत सादर 03 ऑगस्ट 2016
- 23 राज्यांनी विधेयक पास केले पहिले राज्य आसाम
- महाराष्ट्र 10 वें राज्य आहे.
- भारतात कॅनडा देशाप्रमाणे दुहेरी जीएसटी व्यवस्था लागू आहे
- सेंट्रल जीएसटी आणि स्टेट जीएसटी.
- भारतातील जीएसटी दर – 0, 5, 12, 18, 28.

## सार्वजनिक वित्त ( public finance / account )

सार्वजनिक महसूल, सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज, या सर्वांचा समावेश सार्वजनिक वित्त या घटकामध्ये होतो.

शासनाच्या जमा खर्चाच्या धोरणाला राजकोषीय धोरण असे म्हणतात. राजकोषीय धोरण महत्त्व सामाजिक लाभाच्या तत्वावर आधारित आखलेले असते.

- 2018 पासून जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होते.
- 31 जानेवारी रोजी चालू वर्षाची आर्थिक पाहणी सुरू होते.
- 1 फेब्रुवारी रोजी साधारण बजेट सादर होते.
- फेब्रुवारी ते मार्च महिन्या दरम्यान बजेटला संसदेचे मान्यता मिळते.
- फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात संसदेचे हिवाळी अधिवेशन असत

# पंचवार्षिक योजना

## १ ) पहिली पंचवार्षिक योजना

- कालावधी – 1 एप्रिल 1951 ते 31 मार्च 1956
- मुख्य भर - कृषी क्षेत्रावर
- प्रतिमान - हेरोल्ड डोमर

- विशेष घटनाक्रम
- योजनेचे उपनाव पुनरुत्थान योजना
- उद्दिष्टे अर्थव्यवस्थेत असामतोल निर्माण करणे रोजगार वाढवणे जीवनमान उंचावणे चलन फुगवट्यावर नियंत्रण ठेवणे
- पूर्ण झालेले प्रकल्प दामोदर खोरे विकास योजना. भाकरा नांगल ( हिमाचल + पंजाब ) कोसी प्रकल्प ( बिहार ) हिराकुड प्रकल्प ( ओरिसा ) महानदीवर.
- सेंद्रिय खत कारखाना ( चित्तरंजन) पश्चिम बंगाल
- हिंदुस्तान एंटीबायोटिक ( पिंपरी - पुणे )

## २ ) दुसरी पंचवार्षिक योजना

- कालावधी - १ एप्रिल 1956 ते 31 मार्च 1961
- मुख्य भर - जड व मूलभूत उद्योग
- प्रतिमान - पीसी महालनोबीस
- उपनाव - भौतिकवादी योजना

- विशेष घटनाक्रम
- भारताचे दुसरे औद्योगिक धोरण
- 1960 1961 साधारण कृषी उद्योग कार्यक्रम
- भिलाई पोलाद प्रकल्प रशिया 1959

## एका वाक्यातील उत्तरे पुढील प्रमाणे -

★ ऑपरेशन ग्रीन अंतर्गत कांदा बटाटा टोमॅटो येतात.

★ शासकीय मालाची खरेदी करणारी तसेच बाजार उपलब्ध करून देणारे सर्वात मोठी सहकारी संस्था ही नाफेड ( NAFED ) आहे.

★ कापड उद्योग हा भारतील प्रथम क्रमांकाचा शेती आधारित उद्योग आहे.

★ अकरावी पंचवार्षिक योजनेमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या दुप्पट 12 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये पायाभूत क्षेत्रांमधील अंदाजे गुंतवणूक आहे.

★ दहाव्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राला अर्थव्यवस्थेचे मूळ प्रेरक वर्ष म्हणून जाहीर केले होते.

★ भाववाढ नियंत्रण करण्यासाठी राजकोषीय उपाय करामध्ये वाढ सरकारी खर्चात कपात हे उपाय आहेत.

★ फिलिप्स वक्ररेषा अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा दर व चलनवाढीचा दर यांचे व्यस्त प्रमाण दर्शविते.

★ शासकीय स्तरावर कुटुंबनियोजन राबवणारा भारत हा जगातील पहिला देश आहे.

★ ग्रामीण पुनरुत्थानासाठी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी प्युरा प्रतिमानावर भर दिला.

★ सागरमाला प्रकल्पांचा उपयोग किनारालगत सामुदायिक विकास हा उद्देश आहेत.

★ लघुउद्योगांसाठी कार्यरत असलेल्या बँका या सिडबी आणि मुद्रा आहेत.

★ मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र कसे बनवता येईल यासाठी मिस्त्री समिती स्थापन करण्यात आली आहे.

★ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबाबत - 19 जुलै 1969 रोजी 14 खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. 15 एप्रिल 1980 रोजी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले.

★ शून्याधारित अर्थसंकल्प पीटर पिहर यांनी मांडला.

★ मध्यवर्ती बँक स्थापन करण्याची शिफारस सर्वप्रथम वॉरंट हेस्टिंग यांनी मांडली.

★ नरसिंह यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अग्रणी बँक योजना संबंधी शिफारस केली होती.

★ धनंजय गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील समितीने राष्ट्रीयकृत बँकांना क्षेत्रिय दृष्टिकोन लागू करण्याची शिफारस केली होती.

★ एकूण पशुधन भारताच्या तुलनेत महाराष्ट्रात - 6.2% आहे

**देशातील सरकारने गरिबी निवारणासाठी त्रिस्तरीय नीतीचा अवलंब केला आहे.**

- पहिली निती - ही वृद्धी आधारित आहे या निधीचा आधार असा आहे की आर्थिक वृद्धीचा प्रभाव समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचावा 1950 व 1960 च्या दशकाच्या सुरुवातीस आपल्या योजनांचा मुख्य उद्देश हाच होता.
- दुसरी नीती - ही तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून ( 1961 ते 1966 ) पासून सुरू झाली याच नितिनुसार 1980 च्या दशकात कामाच्या मोबदल्यात अन्न हा कार्यक्रम सुरू करण्यात आला.
- तिसरी निती - यात गरिबी निवारणासाठी लोकांना किमान आधारभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
ध्येयवेड्या स्पर्धकांना समर्पित ..

शब्दसंकलन – सुरेश नारायण कुंभार

आधिक महितीसाठि संकेतस्थळाला भेट द्या
www.mpscshort.in

( Teligram चेनल जॉइन करा आणि मिळवा सर्व स्पर्धा परीक्षा अपडेट मोफत @mpscshorts )

© All right reserved @mpscshorts – 2024 ( education perpose only don't violate coppyright Act )

#Udyam registation number - MH-25-0036092

Contact@mpscshort.in / +917709043437


मराठी व्याकरण
Marathivyakaran.com
मराठी
व्याकरण
कमी वेळात जास्त सराव...
महत्वाचे अभ्यास घटक
भाषेची ओळख
अभ्यासाची सुरवात
अभ्यास कसा करावा
संपूर्ण मराठी व्याकरण
सराव पेपर
@mpscshorts
7709043437 / 7720039454


स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
www.mpscshort.in
इंग्रजी
व्याकरण
यशाची गुरुकिल्ली ...
महत्वाचे अभ्यास घटक
ENGLISH
Vocabulary
sentence tense
one word for group
similar words
voice
@mpscshorts
7709043437 / 7720039454


स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
www.mpscshort.in
अर्थशास्त्र
सोप्या भाषेत
महत्वाचे अभ्यास घटक
लोकसंख्या
राष्ट्रीय उत्पन्न
बँक आणि उद्योग
पंचवार्षिक योजना
महत्वाचे निर्देशांक
@mpscshorts
7709043437 / 7720039454


स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
www.mpscshort.in
राज्यशास्त्र
मूलभूत हक्क आणि कर्तव्य
महत्वाचे अभ्यास घटक
विषय सूची
न्यायव्यवस्था
महत्वाचे कलम
राज्यघटना समित्या
लोकसभा - विधानसभा
@mpscshorts
7709043437 / 7720039454


स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
www.mpscshort.in
प्राचीन संक्षिप्त
भारताचा
इतिहास
महत्वाचे अभ्यास घटक
संपूर्ण भारताचा इतिहास
आवश्यकते नुसार चार्ट
महत्वाचे वनलाईनर
महाराष्ट्राचा इतिहास
समाज सुधारक
@mpscshorts
7709043437 / 7720039454


स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
www.mpscshort.in
प्राकृतिक
भूगोल
कमी वेळात जास्त सराव...
महत्वाचे अभ्यास घटक
महाराष्ट्र / भारत
लोकसंख्या घटक
नद्या / खनिजे / पठारे
आवश्यकते नुसार नकाशे
पर्यावरण
@mpscshorts
7709043437 / 7720039454







sureshmaza@kotak

Scan & pay >

Suresh narayan kumbhar

**यात तुम्हाला मिळणार... !!**

1. कोणत्याही एका विषयाची नोट्स किंमत = ५०/- रुपये
2. कोणताही दोन विषयाच्या नोट्स = ९० /- रुपये
3. सर्व नोट्स एकत्र घेतल्यास = २०० रुपये फक्त /-

**यातिल कोणत्याही नोट्स घेतल्यास सोबत मिळणार [ चालू घडामोडी मासीक चालू महिना ]**

**( पैसे पाठवल्या नंतर +917709043437 या नंबर वर स्क्रीनशॉट पाठवा )**

आधिक माहितीसाठि संकेतस्थळाला भेट द्या

www.mpscshort.in

( Teligram चेनल जॉइन करा आणि मिळवा सर्व स्पर्धा परीक्षा अपडेट मोफत @mpscshorts )

© All right reserved @mpscshorts – 2024 ( education perpose only don’t violate coppyright Act )

#Udyam registation number - MH-25-0036092

Contact@mpscshort.in / +917709043437